अतितात्काळ

आयुक्त दुग्धव्यवसाय विकास यांचे कार्यालय,
महाराष्ट्र राज्य,
प्रशासकीय इमारत,
अब्दुल गफारखान मार्ग,
वरळी सीफेस,मुंबई-४०००१८.

**दूरध्वनी** :०२२- २४९३७०६४ FAX : ०२२-२४९३ ७२०८ email - dyddcadmin@gmail.com

सं.क्र.आदुवि-१५(२) / मलोआ मागणीपत्र / प्र.क्र.१०/ २०१६ / ७८३२

प्रति

28 OCT 2016

उप सचिव (कार्यासन-१४अ)
सामान्य प्रशासन विभाग
मंत्रालय,मुंबई-३२.

विषय :- महाराष्ट लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या उमेदवारांना लिपीक टंकलेखक पदावर नियुक्ती देण्याबाबत

संदर्भ :- १. सामान्य प्रशासन विभाग शासन ज्ञापन क्र.एएससी १५१६/ प्र.क्र.१३५/ १४-अ दि.२९.०९.२०१६

२. शासनपत्र क्र.दुविआ १४१६/ प्र.क्र.२४१/पदुम-९ दि.२८.१०.२०१६

उपरोक्त विषयांकीत संदर्भ क्र.२ वरील पत्राची प्रत सोबत जोडण्यांत येत आहे.

उपरोक्त सदंर्भ क्र.१ वरील पत्रान्वये आयुक्त दुग्धव्यवसाय विकास विभागासाठी सामान्य प्रशासन विभागाकडून महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत लिपीक टंकलेखक या पदासाठी ५१ उमेदवार उपलब्ध करुन देण्यांत आलेले आहेत.

दुग्धव्यवसाय विकास विभागाचा सुधारीत आकृतीबंध दि.३०.०८.२०१४ च्या शासन निर्णयानुसार मंजूर झालेला आहे. सुधारित आकृतीबंधानुसार दुग्धव्यवसाय विकास विभागांतर्गत इतर प्रादेशिक विभागामध्ये लिपिक-टंकलेखक संवर्गात ७० कर्मचारी अतिरिक्त ठरत आहेत. सदर कर्मचाऱ्यांचे दुग्धव्यवसाय विकास विभागांतर्गत असलेल्या बृहन्मुंबई व इतर प्रादेशिक कार्यालयातील लिपिक टंकलेखक या संवर्गातील सरळसेवेच्या रिक्त पदावर समायोजन करण्यासाठी शासनास दि.३०.०८.२०१६ रोजी प्रस्ताव पाठविण्यांत आलेला आहे. प्रस्तुत प्रकरणी समायोजनाबाबतची कार्यवाही शासन स्तरावरुन सुरु आहे.

त्यामुळे सामान्य प्रशासन विभागाकडून महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत उपलब्ध करुन देण्यांत आलेल्या ५१ उमेदवारांना या विभागात नियुक्ती देणे शक्य नसल्याने हजर होण्यास आलेल्या उमेदवारांना या विभागात रुजू करुन घेण्यांत आलेले नाही. तसेच सदर उमेदवारांकडून कोणतीही कागदपत्रं घेण्यांत आलेली नाहीत. उपरोक्त संदर्भ क्र.१ वरील पत्रासोबत प्राप्त ५१ उमेदवारांचे नियुक्ती आदेश व सहपत्र या पत्रासोबत परत पाठविण्यांत येत आहेत. कृपया पोहोच द्यावी.

सोबत :- वरीलप्रमाणे

मा.आयुक्त यांच्या मान्यतेने

उप आयुक्त (प्रशासन)
दुग्धव्यवसाय विकास विभाग

प्रत :-
संबंधित उमेदवार

त्यांना कळविण्यांत येते की, आपणांस या विभागात नियुक्ती देणे शक्य नसल्याने आपण दि.०३.११.२०१६ पूर्वी सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा.